# आय.सी.डब्ल्यू.ए.च्या स्थानिक शाखाध्यक्षपदी रामानंद मोदानी

औरंगाबाद, दि. २६ (लो.वा.से.)- इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अॅण्ड वर्क्स अकाऊंटस् ऑफ इंडिया (आय.सी.डब्ल्यू.ए.) च्या औरंगाबाद शाखेच्या अध्यक्षपदी रामानंद मोदानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नितीन शर्मा यांची सचिवपदी निवड झाली आहे.

आय.सी.डब्ल्यू.ए.च्या औरंगाबाद शाखेची वार्षिक सर्वसाधारण सभा काल झाली. या सभेत नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. सभेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सदस्य ए.आर.



**(आय.सी.डब्ल्यू.ए.) च्या औरंगाबाद शाखेच्या अध्यक्षपदी रामानंद मोदानी यांची नियुक्ती करण्यात आली त्यावेळी त्यांचा सत्कार करताना सुरेश पिंपळे.**

जोशी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एम.आर. पंडित उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी मागील वर्षाच्या कामाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर घोषित करण्यात आलेली नवीन कार्यकारिणी अशी: अध्यक्ष- रामानंद मोदानी, उपाध्यक्ष- सुभाष खडके, सचिव- नितीन वर्मा, सहसचिव- गिरीश कुलकर्णी, कोषाध्यक्ष- प्रशांत अग्रवाल, कार्यकारिणी सदस्य- एम.आर. पंडित, आर.पी. गोरे, अशोक पाटील, एस.जे. देवरे, सचिन राठी, अनुप आस्थाना, आर.जी. झंवर आणि बी.एस. इंदाणी. कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन नितीन शर्मा यांनी केले.